# PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI
ELECTRIC SUPPLY &
TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी
पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा
आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१.


कृपया प्रसिध्दीकरिता सादर

संपादक/वृत्तसंपादक

(हनुमंत गोफणे )
जनता संपर्क अधिकारी
दूरध्वनी क्र. २२७९९३९५

---

प्रसिध्दीपत्रक क्र.३९
दिनांक : ०६.०४.२०१८

**बेस्ट समितीच्या अध्यक्षपदी श्री. आशिष चेंबुरकर यांची बिनविरोध निवड**

मुंबई, ०६ - बेस्ट समितीच्या अध्यक्षपदी शिवसेना पक्षाचे श्री आशिष चेंबुरकर हे दिनांक ०६ एप्रिल, २०१८ रोजी झालेल्या निवडणुकीत बिनविरोध निवडून आले.

श्री चेंबुरकर हे प्रभाग क्र. १९६ (वरळी) चे नगरसेवक असून ते वरळी येथून चारवेळा नगरसेवक म्हणून निवडून आलेले आहेत. तसेच ते शिवसेना दक्षिण मुंबई विभाग क्र. ११ चे विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय त्यांनी यापूर्वी तीन वेळा बेस्ट समितीचे अध्यक्षपद भूषविले आहे. सध्या ते प्रभाग समिती अध्यक्ष-जी/दक्षिण विभाग (मनपा) म्हणून कार्यरत आहेत.

मुंबईचे महापौर माननीय श्री.विश्वनाथ महाडेश्वर यांनी बेस्ट समिती अध्यक्षपदाच्या निवडणुकीत पीठासीन अधिकारी म्हणून काम पाहिले.

श्री चेंबुरकर यांची बेस्ट समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल मुंबईचे महापौर माननीय श्री. विश्वनाथ महाडेश्वर, स्थायी समितीचे अध्यक्ष व बेस्ट समितीचे पदसिध्द सदस्य श्री यशवंत जाधव, सर्व बेस्ट समिती सदस्य तसेच बेस्टचे महाव्यवस्थापक डॉ. सुरेन्द्रकुमार बागडे यांनी श्री. चेंबुरकर यांचे अभिनंदन केले.

====